# सारस्वत विद्यार्थी साहाय्यक मंडळी

स्थापना १९०२ आणि नोंदणी १९१४ ✦ रजि. नं. अे-१५०२ (बॉम्बे) ता. १-६-१९५३

''वा. स. कुवाडेकर कार्यालय'', चिकित्सक समूह भवन, गिरगांव, मुंबई-४०० ००४. दूरध्वनी क्र. २३८६ ९१६७

---

## कर्जाऊ शिष्यवृत्ती

(परिशिष्ट व अर्ज हा करारपत्राचा भाग असेल.)

गौड सारस्वत ब्राह्मण ज्ञातीतील (पोटभेदांकडे लक्ष न देता) गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर कला, विज्ञान व वाणिज्य, अभियांत्रिकी, वैद्यकीय, कृषी उद्योग, व्यवस्थापन, संगणक, माहिती तंत्रज्ञान, शिक्षण क्षेत्रातील व अन्य विषयांच्या पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीला हे उच्च शिक्षण घेण्यासाठी आर्थिक सहाय्य म्हणून कर्जाऊ शिष्यवृत्ती देण्यात येईल. मात्र हा अभ्यासक्रम व शिक्षण सरकारमान्य विद्यापीठाचा असावा.

✲ **पात्रता :** गौड सारस्वत ब्राह्मण ज्ञातींतील (पोटभेदांकडे लक्ष न देता) पदवी परीक्षा किमान ७५ टक्क्यांहून अधिक गुण मिळवून वर उल्लेखिलेल्या क्षेत्रांमध्ये उच्च शिक्षण घेऊ इच्छिणारे गरजू व होतकरू विद्यार्थी / विद्यार्थिनी या कर्जाऊ शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्यास पात्र असतील. गरजेनुसार ही अट शिथील करण्याचा अधिकार मंडळीस असेल.

✲ **अर्ज करावयाची पद्धत :** अर्जदार विद्यार्थ्यांनी संस्थेच्या विहींत नमुन्याच्या छापील फॉर्मवर सुवाच्च अक्षरांत जरुर त्या माहितीसह अर्ज करावा. अर्जात विचारलेली माहिती भरली नसल्यास, किंवा ती चुकीची आढळल्यास त्या अर्जाचा विचार होणार नाहीं. असा अर्ज त्यासोबत जोडावयाच्या आवश्यक त्या कागदपत्रांसह नवीन शैक्षणिक वर्षाच्या ३१ जुलैपूर्वी मंडळीच्या कार्यालयात निश्चित पोहोचेल असा पाठवावा.

✲ **कर्जाऊ शिष्यवृत्तीची रक्कम :** ही अर्जदाराच्या शैक्षणिक खर्चाच्या गरजेनुसार जास्तीत जास्त पन्नास हजार रुपयांपर्यंत मंजूर केली जाईल. मंजूर केलेली रक्कम आवश्यकतेप्रमाणे शैक्षणिक वर्षाच्या कालावधीत एक, दोन किंवा तीन हप्त्यांमध्ये देण्यात येईल. कोणत्याही एका शिक्षणक्रमासाठी फक्त एकदाच ही शिष्यवृत्ती देण्यात येईल. त्याचप्रमाणे अपवादात्मक अर्जाच्या बाबतींत ५० हजार रुपयांची मर्यादा वाढविण्याचा अधिकार व्यवस्थापक मंडळाला राहील. कर्जाऊ शिष्यवृत्ती मंजूर करण्यासंबंधीचे सर्वाधिकार सारस्वत विद्यार्थी साहाय्यक मंडळाकडे असतील. व ते अंतिम असून अर्जदार विद्यार्थ्यांना बंधनकारक असतील.

✲ **व्याज :** कर्जाऊ शिष्यवृत्ती म्हणून दिलेल्या रकमेवर पदव्युत्तर शिक्षणाच्या विहीत कालावधीपर्यंत व त्यानंतर पुढे एक वर्षापर्यंत शिष्यवृत्तीच्या रकमेची परतफेड केल्यास व्याज आकारले जाणार नाही. त्यानंतर परतफेड केल्यास शिल्लक रकमेवर द. शे. ६% दराने सरळव्याज आकारण्यांत येईल. उदा. जर विद्यार्थ्याच्या उच्च शिक्षणाचा कालावधी दोन वर्षे व त्यास दिलेली कर्जाऊ शिष्यवृत्ती रु. ५०,०००/- असेल, व जर त्या विद्यार्थ्याने शिक्षणाचा कालावधी २ वर्षे व त्यानंतर १ वर्ष अशा ३ वर्षामध्ये कर्जाऊ शिष्यवृत्तीची सर्व रक्कम परत केली तर त्यावर कोणतेही व्याज आकारले जाणार नाही. जर काही रक्कम शिल्लक राहिली तर शिल्लक रकमेवर द.सा.द.शे. ६ टक्के दराने सरळव्याज आकारले जाईल.

✲ **मंडळीच्या दोन सभासदांनी द्यावयाचा दाखला :** अर्जदाराने त्यांच्या कुटुंबाला/घराण्याला ओळखत असलेल्या मंडळीच्या सभासदांकडून दाखलेवजा शिफारस अर्जावर मिळविणे जरुरीचे आहे.

✲ **जामीन :** कर्जाऊ शिष्यवृत्तींच्या दिलेल्या संपूर्ण रकमेच्या परतफेडींच्या हमीदाखल संबंधित विद्यार्थ्याला साठ वर्षाहून कमी वय असलेल्या दोन व्यक्तींचे जामीन द्यावे लागतील. त्यापैकी एक अर्जदार विद्यार्थ्याचे आईवडील किंवा जवळचा नातेवाईक असावा. याशिवाय अर्जदार विद्यार्थ्यांच्या जामीनदार पालकाला विहिंत नमुन्यामध्ये संमतीपत्रकही द्यावे लागेल. जामीनदार व्यक्ती गौड सारस्वत ब्राह्मण ज्ञातींतील नोकरीं किंवा उद्योग व्यवसायातील आणि मंडळींला मान्य असलेली व्यक्ती जामीन राहण्यासाठीं पात्र असेल. अर्जदार व जामीनदारांनी करारपत्रात दिलेल्या त्यांच्या निवासी पत्यामध्ये बदल झाल्यास त्यांनी नवीन पत्ता सारस्वत विद्यार्थी साहाय्यक मंडळीच्या कार्यालयात त्वरित कळवावा.

✲ **रकमेचें वितरण :** कर्जाऊ शिष्यवृत्ती मंजूर झाल्यानंतर संबंधित विद्यार्थ्याला कळविण्यात येईल. त्यानंतर कळविलेल्या मुदतीत अर्जदाराने मंडळीच्या कार्यालयांत जामीनदारांसह समक्ष येऊन मंडळींच्या पदाधिकाऱ्यांबरोबर आवश्यक त्या करारपत्र / हमीपत्र व आवश्यक त्या सर्व कागदपत्रांची पूर्तता झाल्याची खात्री करुन घेतल्यावर अर्जदार विद्यार्थ्याला देय रकमेचा धनादेश देण्यात येईल. रक्कम वितरणाच्या सोयीसाठी शिष्यवृत्ती मंजूर झाल्याचे कळल्यानंतर विद्यार्थ्याच्या नावे बँकेत खाते उघडावे व त्या बँकेचे नाव, शाखा, खाते क्रमांक व पत्ता ही माहिती मंडळीस अवश्य द्यावी.

# सारस्वत विद्यार्थी साहाय्यक मंडळी

स्थापना १९०२ आणि नोंदणी १९१४ ✦ रजि. नं. ए-१५०२ (बॉम्बे) ता. १-६-१९५३

''वा. स. कुवाडेकर कार्यालय'',- चिकित्सक समूह भवन, गिरगांव, मुंबई-४०० ००४. दूरध्वनी क्र. २३८६ ९१६७

| व्यवस्थापक मंडळाचा निर्णय :- |
|---|
| |

## पदवीनंतरच्या उच्च शिक्षणाकरीता कर्जाऊ शिष्यवृत्तीसाठी अर्ज

विद्यार्थ्याने स्वतः भरावयाची माहिती (मराठी किंवा इंग्रजीत सुवाच्च अक्षरात)

सन्माननीय चिटणीस

**सारस्वत विद्यार्थी साहाय्यक मंडळी,**

चिकित्सक समूह भवन, सदाशिव क्रॉस लेन, मुंबई-४०० ००४ यांना

स. न. वि. वि.

मी खाली सही करणार, सा.वि.सा.मंडळीकडून विद्यार्थ्यास देण्यात येणा-या उच्च शिक्षण कर्जाऊ शिष्यवृत्तीकरिता नियमान्वये आवश्यक असलेली माझ्या विषयी संपूर्ण माहिती खालीलप्रमाणे देउन अर्ज करीत आहे.

१. विद्यार्थ्याचे संपूर्ण नाव व पूर्ण पत्ता : ______________________

______________________

______________________ पिन कोड : ______________ दूरध्वनी क्र. ______________

मोबाईल क्र. ______________ ई-मेल ______________

आधार कार्ड क्र. ______________ पॅन क्र. (असल्यास) ______________

२. विद्यार्थ्याचे वडील / आई यांचे संपूर्ण नांव व पूर्ण पत्ता : ______________

______________________

______________________ पिन कोड : ______________ दूरध्वनी क्र. ______________

मोबाईल क्र. ______________ ई-मेल ______________

आधार कार्ड क्र. ______________ पॅन क्र. (असल्यास) ______________

३. विद्यार्थ्याच्या पालकाचे संपूर्ण नाव, पूर्ण पत्ता आणि विद्यार्थ्याशी नाते : ______________

______________________

______________________ पिन कोड : ______________ दूरध्वनी क्र. ______________

मोबाईल क्र. ______________ ई-मेल ______________

४. विद्यार्थी अविवाहित / विवाहित ?

६. मूळ गाव ______________ तालुका ______________ जिल्हा ______________

७. कुलदेव व गोत्र : ______________________

८. कायमचा निवासी पत्ता : ______________________

______________________

______________________ पिन कोड : ______________ दूरध्वनी क्र. ______________

मोबाईल क्र. ______________ ई-मेल ______________

९. अर्जदार पूर्वी मंडळीचा विद्यार्थी होता काय ? ______________________
असल्यास फोलिओ नंबर

१०. शिष्यवृत्ती मंजूर झाल्यास कळविण्यांचा पत्ता : ______________________

______________________ पिन कोड : __________ दूरध्वनी क्र. __________

मोबाईल क्र. __________ ई–मेल __________

११. अ) सध्या शिकत असलेल्या महाविद्यालयाचे अगर संस्थेचे नाव व पत्ता : ______________________

______________________ पिन कोड : __________ दूरध्वनी क्र. __________

मोबाईल क्र. __________ ई–मेल __________

आ) ती सरकारी, रजिस्टर्ड अगर खाजगी आहे याचा तपशील : ______________________

१२. अ) अर्जदाराची शैक्षणिक पात्रता तपशीलवार माहिती सोबत जोडावी : ______________________

आ) ज्या शिक्षणासाठी कर्ज पाहिजे त्या अभ्यासक्रमाची तपशीलवार माहिती : ______________________

१३. अभ्यासक्रमाचे नांव : ______________________

१४. कालावधी : ______________________

१५. अंदाजे अपेक्षित वार्षिक खर्च : ______________________

१६. ज्या शैक्षणिक संस्थेत शिक्षण घेणार त्या संस्थेचे पूर्ण नाव व पत्ता : ______________________

______________________ पिन कोड : __________ दूरध्वनी क्र. __________

मोबाईल क्र. __________ ई–मेल __________

१७. या शिक्षणसाठी अन्य संस्थाकडून/बँकेकडून कर्ज घेतले आहे काय ? असल्यास संस्थेचे/बँकेचे नाव व रक्कम : ______________________

वरील सर्व माहिती खरी आहे. मी गौड सारस्वत ब्राह्मण असून, मला माझा शिक्षणक्रम पूर्ण करण्यासाठी कर्जाऊ शिष्यवृत्तींची आवश्यकता आहे. मला ही कर्जाऊ शिष्यवृत्ती मिळाल्यास संस्थेच्या सर्व अटींप्रमाणे वागण्यास मी बिलकूल कसूर करणार नाही.

स्थळ :

दिनांक : विद्यार्थ्याची सही

# विद्यार्थ्याने पाळावयाच्या अटी व लिहून द्यावयाचा करार

१. मी या अभ्यासक्रमाच्या कालावधीमध्ये मला दुसऱ्याकडून आर्थिक मदत मिळाल्यास किंवा मी नोकरी किंवा व्यवसाय पत्करल्यास, शिक्षणाची फी माफ झाल्यास किंवा कमी झाल्यास मी व्यवस्थापक मंडळीस ताबडतोब लिहून कळवीन.

२. मी नेहमी चांगल्या रीतीने वागेन, विद्यार्थ्यास अनुचित असे कृत्य केव्हाही करणार नाही. संस्थेकडून मला मिळालेली कर्जाऊ रकमेची मला नोकरी लागताच, शक्य तितक्या लवकर परतफेड करणे मला बंधनकारक राहील.

३. मी या अभ्यासक्रमाच्या प्रगतीचा व झालेल्या वार्षिक परीक्षांचा दाखला संस्था प्रमुख्यांच्या सही शिक्यानिशी मंडळीकडे न चुकता पाठवीन.

स्थळ :

दिनांक : विद्यार्थ्याची सही

## ब. आई-वडील अगर पालक यांनी भरावयाची माहिती

१. वडील / पालकाचे पूर्ण नाव ____________________

२. वडील / पालकाचा व्यवसाय ____________________

३. वडील / पालकांचा पुर्ण पत्ता ____________________

____________________

____________________ पिन कोड : ____________ दूरध्वनी क्र. ____________

मोबाईल क्र. ____________ ई-मेल ____________

४. शिधापत्रिकेची साक्षांकित प्रत/आधार कार्ड व पॅन कार्डची प्रत (दाखला/फार्म १६ (अ)/मालकाकडून उत्पन्नाचे प्रमाणपत्र सोबत जोडावे.

५. वडील / पालकाचे एकूण वार्षिक उत्पन्न : ____________

६. जामीनदारासंबंधी भरावयाची माहिती

१) जामिनदाराचे नाव ____________ वय ______ शिक्षण ______

पत्ता ____________________ व्यवसाय ____________

मोबाईल क्र. ____________ ई-मेल ____________

आधार कार्ड क्र. ____________ पॅन क्र. (प्रत जोडणे आवश्यक) ____________

२) जामिनदाराचे नाव ____________ वय ______ शिक्षण ______

पत्ता ____________________ व्यवसाय ____________

मोबाईल क्र. ____________ ई-मेल ____________

आधार कार्ड क्र. ____________ पॅन क्र. (प्रत जोडणे आवश्यक) ____________

## पालकांचे संमतीपत्र

माझा मुलगा/मुलगी/पाल्य श्री./कु. ____________________ हा/ ही आपल्या संस्थेकडून कर्जाऊ शिष्यवृत्तीसाठी मागणी करीत असून त्याने / तिने अर्जात दिलेली माहिती खरी असून त्याला/ तिला कर्जाऊ शिष्यवृत्ती मंजूर झाल्यास मी व तो / ती संयुक्तरीत्या परतफेड करण्यास तयार आहे. असा संस्थेशी आम्ही करार करुन देऊ. संस्थेने ठरवून दिलेल्या मुदतींत व हप्त्यांनुसार कर्जाची परतफेड करु. संस्थेने ठरवून दिलेल्या मुदतीत कर्जाऊ शिष्यवृत्ती परतफेड न झाल्यास संस्था ठरवील त्या दराने थकबाकीसह व्याज भरण्यास माझा पाल्य व मी तयार आहे.

स्थळ : सही : ____________

दिनांक :

वडील/पालकांचे पूर्ण नांव : ____________